**प्रेस नोट दि. २७.११.२०२५**

**आरोपी लोकसेवक १) श्री. पुजन विलास भंडारे वय ३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी (वरिष्ठ सहाय्यक लेखा)भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली वर्ग-३ रा. जुना स्टॅण्ड रोड, भोई गल्ली, कासेगाव ता. वाळवा जि. सांगली, २) श्री. निखील राजीव कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय –नोकरी (कनिष्ठ सहाय्यक लेखा), भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली वर्ग-३ रा. ६, माता सावित्रीबाई फुले, सोसायटी, नांदणी रोड, मौजे संभाजीपूर , जयसिंगपूर ता. शिरोळ जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथमतः २,५००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती २,०००/- रूपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाईमध्ये २,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सांगली |
|---|---|
| पोलीस स्टेशन | विश्रामबाग पोलीस ठाणे, जि.सांगली |
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| तक्रारदार | पुरुष वय ५२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १) श्री. पुजन विलास भंडारे वय ३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी (वरिष्ठ सहाय्यक लेखा)भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली वर्ग-३ रा. जुना स्टॅण्ड रोड, भोई गल्ली, कासेगाव ता. वाळवा जि. सांगली<br>२) श्री. निखील राजीव कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी (कनिष्ठ सहाय्यक लेखा), भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली वर्ग-३ रा. ६, माता सावित्रीबाई फुले, सोसायटी, नांदणी रोड, मौजे संभाजीपूर , जयसिंगपूर ता. शिरोळ जि.कोल्हापूर |
| पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक | प्रथमतः २,५००/- (दोन हजार पाचशे रुपये ) लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,०००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले.<br>दि.२७.११.२०२५ रोजी भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली पहिला मजला येथे |
| सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम | २,०००/- (दोन हजार ) रुपये लाचेची मागणी |
| सापळा कारवाई दिनांक व ठिकाण | दि.२७.११.२०२५ रोजी भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली पहिला मजला येथे |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार हे लोकसेवक असून त्यांचे भविष्य निर्वाह निधी मधील ५,००,०००/- रुपये मंजुर रक्कम काढण्याकरीता सदर मंजुर प्रस्तावाचे बिल ट्रेझरी ऑफिस येथे पाठविण्याकरीता आलोसे क्रमांक १ यांनी तक्रारदार यांच्याकडे पैशाशिवाय सहकार्य होत नाही असे म्हणून लाच मागणी केले बाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली येथे दि.२७/११/२०२५ रोजी दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २७/११/२०२५ रोजी पडताळणी केली असता आलोसे क्र. १ यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांचे भविष्य निर्वाह निधी मधील ५,००,०००/- रुपये, मंजुर रक्कम काढण्याकरीता सदर मंजुर प्रस्तावाचे बिलावर वरिष्ठ अधिकारी लेखा विभाग जिल्हा परिषद सांगली यांच्या सहया घेऊन ते ट्रेझरी ऑफिस येथे पाठविण्याकरीता प्रथमतः २,५००/- रुपये लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आलोसे क्र २ यांनी लाच मागणी चर्चेमध्ये सहभागी होऊन आलोसे क्र १ यांनी मागितलेली लाच रक्कम देण्याकरिता तक्रारदार यांना प्रोत्साहित केले तसेच तक्रारदार यांचे काम करुन देण्याची हमी आलोसे क्रमांक १ व २ यांनी दिली.<br>दिनांक २७/११/२०२५ रोजी आलोसे क्र १ यांना तक्रारदार यांचेकडून २,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारताना भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, कार्यालय जिल्हा परिषद सांगली या ठिकाणी पंचा समक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच आलोसे क्र २ यांना सुध्दा कार्यालयातून ताब्यात घेण्यात आले आहे.<br>श्री. पुजन विलास भंडारे वय ३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी (वरिष्ठ सहाय्यक लेखा)भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली वर्ग-३ २) श्री. निखील राजीव कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी (कनिष्ठ सहाय्यक लेखा), भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली वर्ग-३ यांचेविरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,७अ,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| तपास अधिकारी | यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक , ला. प्र. वि. सांगली |
| मार्गदर्शन अधिकारी | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |
| सापळा पथक | पोलीस निरीक्षक श्री.किशोरकुमार खाडे, तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, उमेश जाधव, चंद्रकांत जाधव पोपट पाटील,ऋषिकेश बडणीकर, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, सलीम मकानदार रामहरी वाघमोडे, अतुल मोरे, सीमा माने, विणा जाधव |
| पर्यवेक्षण अधिकारी | यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक , ला. प्र. वि. सांगली |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :- १ .वेबसाईट –** www.acbmaharashtra.gov.in

**२. ई मेलआयडी –** dyspacbsangali@gmail.com

(पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली — शिक्का)

२७/११/२५

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.